प्रति,

मा. जनसंर्पक अधिकारी सो,

पुणे शहर

यांना सविनय सादर

प्रतिवेदक - एस. आर. काटे पोलीस उप निरीक्षक लष्कर पोलीस स्टेशन पुणे

यांजकडुन विनंतीपुर्वक की,

विषय - अपनयन केलेल्या मुलाचा व अज्ञात आरोपीचा तपास होणेकामी वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्दी होणे बाबत...

-----ooooo-----

लष्कर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं. ११३/२०१८ मधील फिर्यादी नामे यांनी फिर्याद दिली की, दि. १२/०५/२०१८ रोजी सकाळी १०/०० वा. फिर्यादीची बहीण टिवलेबाई, सुस्मीता व सासरे यांच्या सोबत फिर्यादी यांचा मुलगा रोहन लोणावळयावरुन पुण्याला लोकलने मजुरी करीता आले होते. त्यावेळी ते स्टेशनवरुन कॅम्पात चालत येत असताना ते पुणे कॅम्प येथील नेहरु मेमोरियल हॉल जवळील गितांजली कुंज सोसायटीच्या गेट जवळील झाडाखाली सावलीला बसले. त्यावेळी फिर्यादीचा मुलगा रोहन फिर्यादीच्या बहीणीला म्हणाला की मी जे.जे.गार्डन जवळ येथुन वडा पाव खाऊन येतो असे म्हणुन गेला तो परत आला नाही. म्हणुन त्याचा आज रोजी फिर्यादीनी व त्याचे नातेवाईकानी पुन्हा सर्वत्र शोध घेतला परंतु तो मिळुन आला नाही. त्यावर फिर्यादीची खात्री झाली की, फिर्यादीच्या मुलास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात ठिकाणी अज्ञात कारणाकरीता घेऊन गेला आहे. म्हणुन फिर्यादीने अज्ञात इसमा विरुध्द तक्रार दिलेने गुन्हा नोंद आहे. सदर मुलाचे वर्णन खालील प्रमाणे



कु. रोहन हेरलाल घोसले वय १० वर्षे सध्या रा.रेल्वे स्टेशन जवळ, लोणावळा, पुणे मुळ पत्ता:- रा. मु.बहीलोलपुर, उत्तमसारा, उत्तमसारा, अमरावती, भातुकली, महाराष्ट्र ४४४६०२, रंगाने काळा सावळा, अंगाने सडपातळ, उंची अंदाजे ४ फुट, केस बारीक, नाक बसके, डाव्या हातावर मराठी भाषेत ओम व इंग्रजी भाषेत पी असे गोंदलेले, अंगात काळया रंगाचा टी शर्ट, काळया रंगाची हाफ पॅन्ट त्यावर पांढ-या रंगाचे बारीक टिपके असलेली डिझाईन पारधी भाषा बोलतो.

येणे प्रमाणे वरील वर्णनाचा मुलगा व अज्ञात आरोपीचा शोध होणे कामी सर्व वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्दी होणेस विनती आहे.